पत्र

जा.क्र. कृआ/विप्र-१/राअसुअ१५१६/डीबीटी/प्रक्र१५ / २०५ /१५
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दि. ०६ ऑगस्ट २०१५

प्रति

**जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी**
**जिल्हा - सर्व**

**विषय -** राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये वितरीत करावयाच्या कृषि औजारांसाठीचे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा (DBT) करण्याबाबत.

संदर्भ : १. केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयाचे पत्र सीपीएस १-१/२०१५-एनएफएसएम दि.९ जुलै २०१५
२. शासन निर्णय क्र. राकृवि ०२१५/प्र.क्र. १५/राकृवियो कक्ष मंत्रालय मुंबई, दि.१ ऑगस्ट २०१५

संदर्भीय शासन निर्णयाद्वारे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये वितरीत करावयाच्या कृषि औजारांसाठीचे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा (DBT) करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. या अनुषंगाने औजारांचे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा (DBT) करण्यासाठी कार्यपद्धती मा. आयुक्त कृषि यांच्या मान्यतेने निश्चित करण्यात आली असून त्याबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना सोबत जोडण्यात आल्या आहेत.

यास्तव आपणास ~~सूचित~~ कळविण्यात येते की, सन २०१५-१६ साठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत कृषि औजारांसाठी अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा (DBT) करण्याच्या कार्यपद्धतीचा अवलंब सोबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार करावा. केंद्र/राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कृषि औजारे उत्पादकांची/ अधिकृत विक्रेता यांची यादी, तांत्रिक तपशील, दर इ. बाबतची संचालक (नि. व गु. नि.) यांनी निर्गमित केलेली माहिती शेतकऱ्यांना अवगत करण्याच्या अनुषंगाने व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत निर्देश मा. आयुक्त कृषि यांनी दिलेले आहेत त्यानुसार उचित कार्यवाही करावी. सदर कार्यपद्धतीचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. DBT कार्यपद्धतीचा मासिक प्रगती अहवाल सादर करावा.

सोबत : वरीलप्रमाणे

**अभियान संचालक (राअसुअ) तथा**
**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महारष्ट्र राज्य, पुणे**

प्रत -

१) मा. अपर मुख्य सचिव, कृषि व पणन मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

२) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, कृषि उद्योग भवन, गोरेगाव(पु)मुंबई-६५ यांना माहितीस्तव सादर

३) कृषि संचालक, (नि. व गु. नि.)

२/- यांना विनंती करण्यात येते की, राअसुअ अंतर्गत कृषि औजारांसाठी अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा (DBT) करण्यासाठी विहित केलेल्या पद्धतीचा समावेश कृषि अभियांत्रिकीकरणाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये करण्यात यावा. तसेच केंद्र/राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कृषि औजारे उत्पादकांची तसेच जिल्हानिहात अधिकृत विक्रेता यांची यादी, तांत्रिक तपशील, दर इ. बाबतची माहिती या कार्यासनास उपलब्ध करून देण्यात यावी.

२) विभागीय कृषि सहसंचालक, सर्व यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

*C:\Users\NeGPA\Desktop\DBT.docx*

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये वितरीत करावयाच्या कृषि औजारांसाठीचे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा (DBT) करण्याबाबत मार्गदर्शक सुचना

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-

केंद्र शासनाच्या कृषि विभागाच्या दिनांक ९ जुलै २०१५ रोजीच्या पत्रानुसार तसेच शासन निर्णय क्र. राकृवि ०२१५/प्र.क्र.१५/ राकृवियो कक्ष दि १ ऑगस्ट २०१५ नुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान २०१५-१६ अंतर्गत औजारे घटकासाठी अनुदानाची रक्कम थेट लाभार्थीच्या खात्यावर जमा (DBT) करण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत. यामुळे औजारे वितरणाच्या सध्याच्या प्रचलित पद्धतीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत औजारे घटकाच्या अंमलबजावणीसाठी कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहील.

**१. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान २०१५ -१६ अंतर्गत औजारंसाठीचे घटक**

- संसाधनाच्या संवर्धनासाठी तंत्र / साधने (सुधारित कृषि औजारे)
- पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी सिंचन साधने
- स्थानिक पुढाकाराच्या बाबीअंतर्गत औजारे/ यंत्रसामुग्री

**२. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान २०१५ -१६ अंतर्गत मंजूर औजारांचा तपशील**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान २०१५ -१६ साठी जा.क्र.कृआ/विप्र.१/राअसुअ-१५१६/मासु/प्र.क्र.१/१५० /१५ दि. ४.६.२०१५ नुसार मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हानिहाय भौतिक व आर्थिक लक्षांक देण्यात आलेले आहेत. केंद्र शासनाने सन २०१५-१६ साठी मंजूर केलेल्या औजाराचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | औजाराचे नाव | अधिकतम अनुदान मर्यादा रु. (किमतीच्या ५० टक्के किंवा अनुदानाची रक्कम पैकी कमी असेल ते) | |
|---|---|---|---|
| | | अ.ज /अ.जा./महिला / अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी | इतर शेतकरी |
| **राअसुअ - भात** | | | |
| १ | पॉवर टिलर (८ एचपी किंवा त्यापेक्षा जास्त क्षमता) | ७५००० | ६००००* |
| २ | रोटाव्हेटर | ३५००० | ३५००० |
| ३ | स्वयंचलित भात लागवड यंत्र | ७५००० | ७५००० |
| ४ | ड्रम सीडर | १५०० | १५०० |
| ५ | मनुष्यचलित फवारणी पंप | ६०० | ६०० |
| ६ | पावर नॅपसॅक फवारणी पंप | ३००० | ३००० |
| ७ | स्वयंचलित भात कापणी यंत्र (रिपर) | ६३००० | ५००००* |
| ८ | स्वयंचलित भात कापणी व बांधणी यंत्र (रिपर कम बायंडर) | १२५००० | १०००००* |
| ९ | भात मळणी यंत्र | ४०००० | ४०००० |
| १० | पंपसंच | १०००० | १०००० |
| ११ | युरिया ब्रिकेट मशीन | ९०००० | ९०००० |
| **राअसुअ- गहू** | | | |
| १ | रोटाव्हेटर | ३५००० | ३५००० |
| २ | कल्टीव्हेटर (बैलचलित) | १०००० | ८०००* |
| ३ | सीड ड्रील | १५००० | १५००० |

| अ.क्र. | औजाराचे नाव | अधिकतम अनुदान मर्यादा रु.<br>(किमतीच्या ५० टक्के किंवा अनुदानाची रक्कम पैकी कमी असेल ते) | |
|---|---|---|---|
| | | अ.ज /अ.जा./महिला / अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी | इतर शेतकरी |
| ४. | गादिवाफा लागवड यंत्र (३५ बीएचपी पेक्षा जास्त क्षमतेच्या ट्रॅक्टर साठी) | ४४००० | ३५००० |
| ५. | पावर नॅपसॅक फवारणी पंप | ३००० | ३००० |
| ६. | पंपसंच | १०००० | १०००० |
| ७ | पाईप | २५/मी.(६०० मी. पर्यंत) | २५/मी.(६०० मी. पर्यंत) |
| ८ | तुषार संच | १०००० | १०००० |
| **राअसुअ – कडधान्य** | | | |
| १ | कल्टीव्हेटर (बैलचलित ) | १०००० | ८०००* |
| २ | रोटाव्हेटर | ३५००० | ३५००० |
| ३ | बहुपीक पेरणी/लागवड यंत्र | १५००० | १५००० |
| ४ | सरी वरंबा लागवड यंत्र (३५ बीएचपी पेक्षा जास्त क्षमतेच्या ट्रॅक्टर साठी) | ६३००० | ५००००* |
| ५ | गादिवाफा लागवड यंत्र (३५ बीएचपी पेक्षा जास्त क्षमतेच्या ट्रॅक्टर साठी) | ४४००० | ३५०००* |
| ६ | मनुष्यचलित फवारणी पंप | ६०० | ६०० |
| ७ | पावर नॅपसॅक फवारणी पंप | ३००० | ३००० |
| ८ | बहुपीक मळणी यंत्र | ४०००० | ४०००० |
| ९ | पंपसंच | १०००० | १०००० |
| १० | पाईप | १५००० किंवा<br>२५/मी.(६०० मी. पर्यंत) | १५००० किंवा<br>२५/मी.(६०० मी. पर्यंत) |
| ११ | तुषार संच | १०००० | १०००० |
| १२ | स्पायरल सेपरेटर | ६००० | ६००० |

*** या औजारांसाठी केंद्र शासनाच्या कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियानाच्या निकषांनुसार इतर शेतकऱ्यांसाठी किंमतीच्या ४० टक्के किंवा अनुदानाची रक्कम यापैकी कमी असेल ते अनुदान देय राहील.**

**३. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान २०१५-१६ अंतर्गत औजारे घटकासाठी अनुदानाची रक्कम थेट लाभार्थींच्या खात्यावर जमा (DBT) करण्याबाबत कार्यपद्धती**

**अ) औजारे घटकासाठी अनुदानाची रक्कम थेट लाभार्थींच्या खात्यावर जमा (DBT) करण्याच्या कार्यवाहीचा व त्यासंदर्भात अनुषांगिक प्रपत्रांचा तपशील**

| अ.क्र | कार्यवाही | कार्यवाही कोणी करावी | आवश्यक अभिलेख/ प्रपत्र |
|---|---|---|---|
| १. | औजारे घटकाबाबत जिल्ह्याला दिलेल्या लक्षांकाच्या अधीन राहून तालुकानिहाय लक्षांक निश्चित करून समाविष्ट औजारांबाबत प्रसिद्धी देणे व शेतकऱ्यांना आवाहन करणे | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | • मार्गदर्शक सुचना<br>• लक्षांक<br>• निधी उपलब्धता |
| २. | केंद्र/राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कृषि औजारे उत्पादकांची/ अधिकृत विक्रेता यांची यादी, तांत्रिक तपशील, दर इ. बाबतची संचालक (नि व गु नि ) यांनी निर्गमित केलेली माहिती शेतकऱ्यांना अवगत करणे. | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | • औजारांची यादी<br>• तांत्रिक तपशील<br>• उत्पादक/अधिकृत विक्रेता यादी |

| अ.क्र | कार्यवाही | कार्यवाही कोणी करावी | आवश्यक अभिलेख/ प्रपत्र |
|---|---|---|---|
| ३. | पसंतीनुसार औजारे खरेदी करण्यासाठी पूर्वसंमती घेण्याचे अनुषंगाने कृषि सहाय्यकामार्फत तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करणे | इच्छुक शेतकरी | • अर्ज नमुना<br>• ७/१२ व ८ अ |
| ४. | शेतकऱ्यांकडून प्राप्त अर्जांची प्राथमिक तपासणी करून तालुकास्तरीय समितीच्या मान्यतेने लाभार्थी निवड करणे व पूर्वसंमती देणे | तालुका कृषि अधिकारी | • पूर्वसंमती पत्र नमुना |
| ५. | निवड झालेल्या लाभार्थींकडून पूर्वसंमती मिळाल्याची पोहोच घेणे | कृषि सहाय्यक | • पूर्वसंमती पत्र पोहोच नमुना |
| ६. | पूर्वसंमती मिळाल्यापासून ४५ दिवसांच्या आत औजाराची खरेदी करणे व अनुदान मिळण्यासाठी कृषि सहाय्यकाकडे प्रस्ताव सादर करणे | लाभार्थी | • अनुदान मागणी अर्ज<br>• देयकाची मूळ प्रत<br>• हमीपत्र |
| ७. | खरेदीबाबतच्या देयकासह लाभार्थ्याकडून प्राप्त परिपूर्ण प्रस्तावानुसार औजाराची पडताळणी /मोका तपासणी करून १५ दिवसात ताकृअ यांना अहवाल सादर करणे | मंडळ कृषि अधिकारी | • तपासणी अहवाल |
| ८. | प्राप्त अहवालानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान अदायगीसाठी पात्र लाभार्थींची देयके तयार करून कोषागारास सादर करणे | तालुका कृषि अधिकारी | |
| ९. | संबंधित लाभार्थींच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करणे | संबंधित कोषागार | |
| १० | लाभार्थींच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा केल्याबाबत पोहोच कोषागाराकडून/ ऑनलाइन पद्धतीने प्राप्त करून घेऊन अभिलेख जतन करणे | तालुका कृषि अधिकारी | |

**ब) लाभार्थी निवड –**

- वैयक्तिक लाभार्थी, नोंदणीकृत शेती उत्पादक संघ, शेतकऱ्यांची उत्पादक कंपनी/ सहकारी संस्था/ शेतीविषयक कार्यरत स्वयंसेवी संस्था/ शेतीविषयक कार्यरत स्वायत्त संस्था.
- भात,गहू, कडधान्य पिकांशी निगडीत नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट, शेतकरी गट, महिला शेतकरी गट. सदरच्या गटाची नोंद प्राधान्याने जिल्हा आत्मा यंत्रणेकडे असावी.
- लाभार्थ्याच्या नावे शेतजमीन असावी, त्यांच्या नावे ७/१२ व ८-अ चा उतारा असणे आवश्यक आहे.
- **जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लाभार्थ्यांची निवड करावी. जिल्ह्यांकरिता प्राप्त होणारा आर्थिक कार्यक्रम राबविताना प्रवर्गनिहाय असलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात यावा. तसेच महिला लाभार्थ्यांसाठी मंजूर आर्थिक कार्यक्रमाच्या किमान ३० टक्के निधी खर्च होईल याबबत कटाक्षाने लक्ष्य द्यावे. महिला लाभार्थ्यांसाठीच्या ३० टक्के राखीव निधीपेक्षा जास्तीची तरतूद आवश्यक असल्यास महिलांच्या प्रवर्गानुसार त्या त्या प्रवर्गातून करावी.**
- औजारे घटकाचा लाभ प्राधान्याने पीक प्रात्यक्षिक कार्यक्रमामध्ये सहभागी शेतकऱ्यांना देण्यात यावा.
- प्रवर्गनिहाय लक्षांकाच्या मर्यादेत प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर लाभार्थी निवड करावी.
- सदरची औजारे चालू स्थितीत ठेवणे व त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे याबाबत हमीपत्र घेण्यात यावे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत कृषि औजारे घटकाचे लाभार्थी निवडीसाठी समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| १. तालुका कृषि अधिकारी | - अध्यक्ष |
| २. मंडळ कृषि अधिकारी | - सदस्य |
| ३. कृषि अधिकारी (पं.स.) | - सदस्य |
| ४. प्रगतीशील शेतकरी(१) | - सदस्य |
| ५. कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय | - सदस्य सचिव |

वरीलप्रमाणे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान २०१५-१६ अंतर्गत कृषि औजारे घटकासाठी अनुदानाची रक्कम थेट लाभार्थींच्या खात्यावर जमा (DBT) करण्याबाबत कार्यपद्धतीचा अवलंब करून सदर घटकाचे लक्षांक पूर्ण करावेत.

अभियान संचालक( राअसुअ) तथा
कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, पुणे

*C:\Users\NeGPA\Desktop\DBT.docx*

**प्रपत्र - १**

**कृषि विभाग, महाराष्ट्र शासन**

**अनुदानित कृषि औजारे खरेदी करण्यासाठी पूर्वसंमती मिळण्याकरिता शेतकऱ्याने करावयाचा अर्ज**

........................................................................................................................................

दिनांक : ....../....../............

प्रति,

मा.तालुका कृषि अधिकारी

तालुका ..................... जिल्हा ......................

१. शेतकऱ्याचे पूर्ण नाव : -------------------- ------------------ -------------------

(आडनाव) (प्रथम नाव) (वडिलांचे/पतीचे नांव)

२.गावाचे नाव : ........................... तालुका : .............................. जिल्हा : ................................

३. लिंग : पुरुष /स्त्री

४. शेतकऱ्याच्या जमिनीचा गट/ सर्वे क्र. .................................

५. शेतकऱ्याचा संपर्क क्रमांक : ....................................................

६. आधार क्रमांक :

६. बँक खाते क्रमांक :

७. बँकेचे नाव व शाखा :

८. IFSC Code :

६. जमीन धारणेनुसार वर्गवारी : अत्यल्प भूधारक /अल्प भूधारक/ इतर

७. सामाजिक वर्गवारी : अनुसुचीत जाती / अनुसुचीत जमाती / इतर

८. अपंगत्व : आहे / नाही

९. लाभ हव्या असलेल्या योजनेचे नाव : राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान भात/गहू/कडधान्य

| अ.क्र . | शासनमान्य औजारे / यंत्रसामुग्रीचे नाव | परिमाण/संख्या |
|---|---|---|
| | | |
| | | |

विनंती करण्यात येते की, उपरोक्त योजनेतील वर नमूद केलेल्या शासनमान्य औजारे / यंत्रसामुग्रीची शासनाने मान्यता दिलेले अधिकृत उत्पादक/विक्रेता यांच्याकडून पूर्ण किंमतीने खरेदी करण्याबाबत पूर्वसंमती मिळावी. यापूर्वी या योजनेतून औजारे घटकांतर्गत मी कोणताही लाभ घेतलेला नाही. वरील औजारांची खरेदी करून अनुदानासाठी आवश्यक त्या कागदपत्रासह परिपूर्ण प्रस्ताव मला पूर्वसंमती मिळाल्यापासून ४५ दिवसात कृषि सहाय्यकाकडे देण्यास मी जबाबदार राहीन

**शेतकऱ्याची सही/अंगठा**

शिफारस करण्यात येते की, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान भात/गहू/कडधान्य या योजनेतील वर नमूद केलेल्या औजारे/ यंत्र सामुग्रीसाठी अनुदानाचा लाभ देण्यास श्री/श्रीमती ............................................ पात्र आहेत. त्यांनी केलेल्या अर्जास मान्यता दयावी ही विनंती. सदर लाभार्थीने यापूर्वी या योजनेतून शिफारस केलेल्या औजारांसाठी लाभ घेतलेला नाही याची मी खात्री केली आहे.

**कृषि सहाय्यक .............**

**प्रपत्र -२**

**मंडळ कृषि अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे पाठवावयाच्या पात्र लाभार्थीच्या यादीचे प्रपत्र**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रति**

**मा. तालुका कृषि अधिकारी**

**तालुका ..............................**

**विषय - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत कृषि औजारे घटकाकरिता पूर्वसंमतीसाठी पात्र शेतकऱ्यांची यादी**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान भात/गहू/कडधान्य अंतर्गत माझ्या कार्यक्षेत्रात कृषि औजारे घटकासाठी पूर्वसंमती करिता पात्र शेतकऱ्यांची यादी खालीलप्रमाणे आहे.

राअसुअ- भात/गहू/कडधान्य ( प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र यादी सादर करावी)

| अ.क्र. | लाभार्थी शेतकऱ्याचे नांव | गाव | सर्व्हे/गट क्र. | प्रवर्ग (अ.ज./अ.जा./ इतर ) | लिंग (स्त्री/पुरुष) | औजाराचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

कृपया वर नमूद केलेले लाभार्थी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पात्र असून त्यांना पूर्वसंमतीदेण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

मंडळ कृषि अधिकारी .........................

**पूर्वसंमती पत्र**

जा क्र. .........
तालुका कृषि अधिकारी कार्यालय
तालुका ............
दिनांक :

प्रति,

श्री/श्रीमती ...................................
मु.पो.......................तालुका ..............जिल्हा .................

दि. ....................... रोजीच्या अर्जा प्रमाणे आपणास राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान भात/ गहू/ कडधान्य या योजने/कार्यक्रमांतर्गत ......................... हे औजार खरेदी करण्यासाठी पूर्वसंमती देण्यात येत आहे.

सदर पूर्वसंमती मिळाल्यापासून ४५ दिवसांच्या आत औजार खरेदी संदर्भात कार्यवाही करून अनुदान मागणीसाठीचा परिपूर्ण प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करावा.

विहित वेळेत आपला परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त न झाल्यास अनुदान अदायगीसाठी ग्राह्य धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

तालुका कृषि अधिकारी ...........

-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o

**पूर्वसंमतीपत्र पोहोच**

श्री/श्रीमती ...................................
मु.पो.............तालुका ............जिल्हा ..........

प्रति

तालुका कृषि अधिकारी
तालुका ................

**विषय - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान भात/ गहू/ कडधान्य या योजने अंतर्गत औजारे खरेदीसाठी पूर्वसंमती मिळाल्याबाबत**

महोदय,

मला राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान भात/ गहू/ कडधान्य या योजने अंतर्गत ................. हे औजारे खरेदीसाठी आपले दि. ..................रोजीच्या पत्रानुसार दिलेली पूर्वसंमती प्राप्त झाली असून सदर औजाराची शासनमान्य खरेदी करून परिपूर्ण प्रस्ताव ४५ दिवसांच्या आत सादर करण्याची जबाबदारी माझी राहील याची पूर्ण जाणीव मला करून देण्यात आली आहे.

लाभार्थीची सही/ अंगठा
नाव. ..................................
मोबाईल क्र. ...........................

# <u>तपासणी अहवाल</u>

| | |
|---|---|
| **१. योजनेचे नाव** | : राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान भात/गहू/कडधान्य |
| **२. लाभार्थीचे नाव** | : ........................................................................ |
| **३. प्रवर्ग** | : ........................................................................ |
| **४. खरेदी केलेल्या औजाराचे नाव** | : ........................................................................ |
| **५. औजाराची उत्पादक कंपनी** | : .......................................................................... |
| **६. औजाराचा अनुक्रमांक (असल्यास)** | : ........................................................................ |
| **७. औजाराची किंमत** | : रु. .................................................................... |
| **८. बिलाचा दिनांक व क्रमांक** | : ....................................................................... |
| **९. औजार प्राप्त झाल्याचा दिनांक** | : ...................................................................... |
| **१०. अधिकृत विक्रेत्याचे नाव** | : ........................................................................ |
| **११. देय अनुदान रक्कम** | : रु. .................................................................... |

श्री /श्रीमती ........................................................................................मु.पो. .......... तालुका .................... जिल्हा ......... यांनी भात/ गहू/ कडधान्य पिकांसाठी खरेदी केलेल्या औजारे/यंत्रसामुग्रीची वरीलप्रमाणे तपासणी मी व्यक्तिश: केलेली असून सदरची औजारे/यंत्रसामुग्रीची सुस्थितीत आहेत. : राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान भात/गहू/कडधान्य योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार देय असलेली अनुदानाची रक्कम रु. .................................. लाभार्थीच्या बँक खात्यावर जमा करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

सोबत - लाभार्थ्याचा प्रस्ताव

स्थळ : **मंडळ कृषि अधिकारी ...................**

दिनांक :

# <u>अनुदान मागणी अर्ज</u>

श्री/श्रीमती ...................................

मु.पो.............तालुका ............जिल्हा ..........

प्रति

मा. तालुका कृषि अधिकारी

तालुका ................

**विषय – राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान भात/ गहू/ कडधान्य या योजने अंतर्गत औजारे खरेदीचे अनुदान मिळाण्याबाबत**

संदर्भ – आपले दि. ............रोजीचे पूर्वसंमती पत्र

महोदय,

वरील संदर्भांकित पूर्वसंमती पत्राचे अनुषंगाने मी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान भात/ गहू/ कडधान्य या योजने अंतर्गत ................. हे औजारे खरेदी केलेले आहे. याबाबतचे अनुदान मिळण्याचे अनुषंगाने परिपूर्ण प्रस्ताव सोबत जोडला आहे तरी मला देय असलेले अनुदान माझे....................................या बँकेच्या ................शाखेतील बँक खाते क्र. ..... ............ वर जमा करण्यात यावे ही विनंती.

सोबत – १) बिलाची मूळ प्रत

२) डिलिव्हरी चलन

३) हमीपत्र

**लाभार्थीची सही/ अंगठा**

नाव. ...................................

मोबाईल क्र. ...........................

# <u>हमीपत्र</u>

मी श्री /श्रीमती ................................................................................................मु.पो. .......... तालुका .................... जिल्हा ......... असे हमीपत्र देतो/ देते की, भात/ गहू/ कडधान्य पिकांसाठी ...................... या औजाराची / यंत्रसामुग्रीची खरेदी मी स्वतः माझ्या जबाबदारीवर करीत आहे. सदरच्या बाबीसाठी प्रोत्साहन म्हणून अनुदान मिळण्यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान भात/गहू/कडधान्य अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. भविष्यात नैसर्गिक आपत्ती व इतर कारणांमुळे सदरच्या औजाराचे / यंत्रसामुग्रीचे नुकसान झाल्यास किंवा गुणवत्तेबाबत काही समस्या निर्माण झाल्यास मी शासनास नुकसान भरपाई मागणार नाही. सदरचे औजार/यंत्रसामुग्री सुस्थितीत ठेवण्यासाठी देखभाल व दुरुस्ती बाबतची आवश्यक ती काळजी घेण्यात येईल. तसेच सदर औजाराचा गैरवापर होणार नाही याची मी हमी देत आहे.

**लाभार्थ्याची सही/ अंगठा**

स्थळ :

दिनांक :

समक्ष :

नाव :

पत्ता :